मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम
४ अन्वये ग्राम पंचायतीचे विभाजन अथवा
नवीन ग्राम पंचायतीची स्थापना.

सर्व समावेशक सूचना.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-११८९/के.नं.३०१०/२२,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: ५ फेब्रुवारी १९९०.

कृपया वाचावे:-

१] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम-१२६६/[४]/ ३१८१/ई, दिनांक २९.८.१९६६.
२] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएस ११६८/सी-२१७/ई, दिनांक १८.७.१९६८.
३] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११६८/८२२७-ई, दिनांक २२.४.६९.
४] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम १३७२४/ई, दिनांक ७.७.६९.
५] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११७०/१२४२१/ई, दिनांक १६.४.७०
६] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११७०/५२८८८/ई, दिनांक ३.१.७३.
७] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम-११७३/ई, दिनांक १५.९.७३,
८] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११७४/२५१००/ई, दिनांक १.७.७४,
९] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११७६/३१२८/२३, दिनांक २८.५.७६,
१०] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११८६/सीआर-२२८३/२२, दिनांक ५.९.८६.
११] शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११८८/३४७५/ सीआर २८५८/२२, दिनांक २१.१२.८८.

शासन परिपत्रक:

ग्राम पंचायतीचे विभाजन करुन स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करणे अथवा नवीन ग्राम पंचायत स्थापन करणेच्या कार्यपध्दती बाबत शासनाने वेळोवेळी परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. या सर्व सूचना व सध्यांची परिस्थिती याचा साकल्याने विचार करुन पूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सर्वसमावेशक आदेश काढण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
13 FEB
शाखा ग्रामपंचायत
स. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

सर्वसाधारण-

१. गाव जाहीर करणे:- मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ४ [१] अन्वये राज्य सरकारला शासकीय राज पत्रांतील अधिसूचनेद्वारे एखादे महसूली



2446/140

गांव किंवा महसूली गावांचा गट किंवा महसूली गावांचा भाग बनवणा-या वाडया समाविष्ट असलेले कोणतेही क्षेत्रा किंवा अन्य प्रशासनिक घटक किंवा त्याचा भाग गाव म्हणून जाहीर करता येते.

३] पोट कलम [२] अन्वये, राज्य सरकारला शासकीय अधिसूचनेद्वारे जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीशी आणि संबंधित पंचायतींशी [जर ती अग्रोदरच स्थापन करण्यात आली असेल तर] विचार विनिमय केल्यानंतर, कोणतेही स्थानिक क्षेत्रा कोणत्याही गांवात समाविष्ट करता येते किंवा कोणत्याही गावातून वगळता येते किंवा कोणत्याही गावांच्या सीमांमध्ये फेरफार करता येते.

४] उक्त कलमांचें अधिकार सर्व विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार विभागीय आयुक्त, या प्रकरणी अंतिम निर्णय घेतात. ज्यावेळेस एखादे स्थानिक क्षेत्रा हे "गाव" म्हणून जाहीर करण्याचे असते. त्यावेळेस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मुंबई ग्राम पंचायत [गांव जाहीर करणे] चौकशी नियम, १९५९ मधील तरतुदीनुसार, त्या गावांची लोकसंख्या, सर्व सामान्य जमीन महसूल आणि त्या स्थानिक क्षेत्राचा विस्तार याबाबत चौकशी करावी लागते. राज्यांतील संपूर्ण ग्रामीण क्षेत्रा हे ग्राम पंचायतीत समाविष्ट करणे हे शासनाचे प्रामुख्याने ध्येय आहे. त्यानुसार हे क्षेत्रा ग्रुप ग्राम पंचायतीमध्ये समाविष्ट करुन शासनाने हे शक्य केले आहे. असे असले तरी अस्तित्वात असलेल्या ग्राम पंचायतीचे विभाजन करुन स्वतंत्रा ग्राम पंचायत स्थापन करणेबाबत सातत्याने मागणी होत असते.

५] आयुक्तांच्या मार्गदर्शनासाठी शासनाने स्वतंत्रा ग्राम पंचायत स्थापन करण्यासंबंधी खालीलप्रमाणे निकष ठरवून दिलेले आहेत-

१] लोकसंख्या:-ज्या गांवी स्वतंत्रा ग्राम पंचायत स्थापन करावयाची असेल त्या गावाची लोकसंख्या ६०० किंवा त्यापेक्षा जास्त असावी. केवळ, अपवादात्मक प्रकरणांत [उदा. दोन गावांत जर जास्त अंतर असेल तर] व वाडी अथवा तांडा यासाठी ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असल्यास तेथे स्वतंत्रा ग्राम पंचायत देण्याचा विचार करण्यांत यावा. लोकसंख्या ही लगतपूर्वीच्या घेतलेल्या जनगणनेच्या जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीवरुन विचारात घ्यावी.

२] आर्थिक परिस्थिती:-नव्याने स्थापन करण्यात येणारी पंचायत ही आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण असावी. म्हणजेच तिचे उत्पन्न तिच्या क्षेत्रातील कामावर दरडोई रु.१० [डोंगराळ व आदिवासी भागांत दरडोई रु.६/-] इतका खर्च करण्याइतपत असावे.

३] इतर:-नव्याने स्थापन होणा-या पंचायतीस ग्रामस्थांना कमीत कमी पुढील सुविधा उपलब्ध करुन देता आल्या पाहिजेत.

अ] पाणी पुरवठा,

ब] रस्त्यावरील दिवाबत्तीची सोय,

क] रस्ते बांधणे/सुस्थितीत ठेवणे व त्याची दुरुस्तीकरणे.

...३/-

६. मुख्य ठिकाण :- मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८चे कलम ४अन्वये जे गांव स्वतंत्र गांव म्हणून जाहीर झाले असेल तेच गांव त्या ठिकाणाचे मुख्य ठिकाण म्हणून दर्शविले जाईल. [यासंबंधीच्या सूचना शासन पत्र, ग्राम विकास विभाग,, क्र.व्हीपीएम ११६५/[४]/६११६४[ए]/ई दि. २४-३-६६अन्वये यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. ]

७. गावाचे क्षेत्र :- ज्यावेळेस गांव म्हणून जाहीर केले जाते त्यावेळेस त्या गावाचे सर्व्हेनंबर नमूद करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक भागाचा समावेश करणे आवश्यक आहे. या कार्यक्षेत्रात रहाणा-या जमीन मालकांची मालकी असेलेली सर्व जमीन जरी विभागणी करतांना सरळ विभागणी करता आली नाही तरी, उपमार्ग वस्त्यांच्या सभोवतालची मोकळी जमीन समाविष्ठ करावी.

८. पुनर्वसित गावे :- पाटबंधारे, प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जी नवीन गावठाणे बसविण्यात येतात. तेथे शासनाने तयार केलेले निकष व अटी शिथिल करुन प्राधान्य तत्वावर "विशेष बाब" म्हणून, ग्राम पंचायती स्थापन करण्यात याव्यात. यापूर्वी शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीई ११८६/सीआर २२८३/२२, दिनांक ५-९-१९८६ व क्र. व्हीपीएम् १२६६[४]/२०१८१/ई, दिनांक २९-८-६६अन्वये अशाच सूचना देण्यात आलेल्या आहे.

९. महसुली गांव :- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६चे कलम ४[१]अन्वये गावठाणाच्या बाहेर असलेली स्वतंत्र वस्ती ३०० पेक्षा लोकसंख्या कमी असलेली, स्वतंत्र महसुली गाव म्हणून जाहीर केले पाहिजे. महसूल विभागाने स्वतंत्र महसुली गाव म्हणून जाहीर न केलेल्या वाडया व तांडे यासाठी स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करण्यांत येऊ नये.

१०. तरीही, गट ग्राम पंचायतीपैकी जेथे सदस्यांनी २ वर्षाहून अधिक काळ काम केले असेल आणि जेथे आणखी तांडे किंवा वाडया समाविष्ट होण्याची शक्यता नसेल तेथे स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करण्यांस हरकत नसावी. [शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.व्हीपीएम १२६७/३३४५७/ई, दि. १८-१२-१९६७][शासन परि. क्र. ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम ११७०/१२४२१/ई, दिनांक १६-४-७०] .

११. स्वतंत्र ग्राम पंचायत मागणी :- आयुक्त किंवा जिल्हा परिषद यांनी स्वतःहून स्वतंत्र ग्रामपंचायतीचे प्रस्ताव करु नयेत. गावातील रहिवासी, ग्राम पंचायत यांनी तसा प्रस्ताव केला तरच त्यावर विचार करावा. जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या कार्यक्षेत्रातील एखादे "महसुली गांव" ग्राम पंचायत नसेल त्या गावास

ग्राम पंचायत स्थापन करण्याची कार्यवाही त्यांनी स्वत:हून करावी. [शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम ११६०/२१०३/ई, दिनांक १२-२-१९९१].

१२. स्थायी समिती आणि संबंधित पंचायतीशी विचार विनिमय:-

बहुतांश, प्रस्ताव करण्या नसतांना ग्राम पंचायत पातळीवर तसेच जिल्हा परिषद स्तरावर [स्थायी समिती] संबंधित ग्राम पंचायत तसेच संबंधित जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या ठराव संमत करण्याच्या कारणास्तव प्रलंबित असतात. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सदरहू प्रस्तावावर त्याचे ठराव संमत करण्यास दोन महिन्यापेक्षा अधिक कालावधी लागता कामा नये. म्हणून ग्रामपंचायत / जिल्हापरिषद, स्थायी समिती यांनी आपले आवश्यक ते मत किंवा ठराव दोन महिन्याच्या आंत संमत करावे, जर त्यांनी तसा ठराव विहित कालावधीत संमत न केल्यास, त्यांची, सदर प्रस्तावास सहमती आहे, असे गृहित धरुन सदर प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

१३. त्रिशंकू गावे: राज्यातील काही गावांचा अगर भागांचा समावेश नगर परिषद किंवा ग्रामपंचायतीच्या हद्दीत नसतो. त्यामुळे तेथील जनतेला नगर परिषद किंवा ग्राम पंचायत निवडणूका मध्ये भाग घेता येत नाही, आणि स्थानिक नागरी सुविधा पासून वंचित रहावे लागते. म्हणून अशी गावे/भाग नजिकच्या ग्राम पंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम ११८८/३४७५/सीआर २८७८/२२, दिनांक २१-१२-८८ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

१४, वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

[सही]

[ना. धों. सुर्वे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन 2/90.

दिनांक 3-3-90 पाठविले
/ कारनिसी लिपिक

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी, [मुंबई व मुंबई उपनगर वगळून]
जिल्हा परिषदेचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
पंचायत समितीचे सर्व गट विकास अधिकारी
महसूल व वन विभाग,
कक्ष अधिकारी, कार्यासन क्र. २१, २१-अ,
निवड नस्ती, का. क्र. २२.

[हस्तलिखित टिपणे व सह्या]